म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५७६



REFBK-0025637
REFBK-0025637

वाटेवरले गाणे / कविता जपे

# वाटेवरले गाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५७६
२५६३८
काव्य
शाखा

मुद्रक
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४, बुधवार पेठ,
पुणे ४११००२

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

© कविता जपे

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

मुखपृष्ट छपाई
रविराज प्रिंटरी

प्रथमावृत्ती
२३ फेब्रु. १९८८

किंमत
२० रुपये

श्री विद्या प्रकाशन

# वाटेवरले गाणे

कविता जपे

REFBK-0025637
REFBK-0025637

" वाटेवरले गाणे "
हिरव्या, टवटवीत प्रसन्न रंगाचे !
हिरवे गर्द भोवताल, ज्या सहज
निरागसपणाने, आपल्याला सामोरे
येते; तेवढ्याच स्वाभाविकपणे
आपल्याशी संवाद साधणारे.
जीवनावर व माणसांवर उत्कटपणे
प्रेम करणाऱ्या
कविता जपे नावाच्या एका संवेदनाक्षम,
उत्कट मुलीने घेतलेला
हा आपल्या अंतरविश्वाचा
आणि त्याबरोबरच आपल्याला वेढून
असणाऱ्या वास्तवाचा शोध आहे.
प्रचलीत काव्यविश्वाशी
कविताचा तसा फारसा संबंध नाही,
त्यामुळे तिची सौंदर्य दृष्टी, प्रतिमा सृष्टी
व्यक्ती व घटना याबद्दलच्या तिच्या प्रतिक्रिया
या कुठल्याही वाङमयीन
संकेतानी पूर्वनियोजित झालेल्या नाहीत.
म्हणूनच
तिने निर्माण केलेले, काव्यविश्व
हे अगदी खास तिचेच आहे.
त्यातल्या गुणांसहीत. त्याप्रमाणे
त्यातल्या उणिवांसहसुद्धा.
आणि हे सारे ध्यानात घेऊनच
रसिकांनीही एका सहज
स्वाभाविक स्नेहभावाने, या
हिरव्या गाण्यांना सामोरे जावयाचे आहे.

शांता शेळके

प्रिय
विश्वास व बकुळ

डोळ्यातल्या
पाण्याबरोबर
स्वप्नेही राहतात
( हे तुम्ही पटवलेत )
आता
स्वप्नांना आकाश अपुरते
म्हणूनही
काठ पाणावतात
डोळीयाचे !

# मनोगत

मी कविता लिहावयास केव्हा व कशी लागले हे मलाही आठवत नाही. पण माणूस ज्या वयात कविता करतो त्याच वयात माझ्याही कवितांना सुरुवात झाली. इतर कविता वाचता वाचताच माझ्याही भावनांना मूर्त स्वरूप येऊ लागले. ग्रेस, शंकर रामाणी, वैद्य, नारायण सुर्वे, आरती प्रभू यांच्या संग्रहांनी मला कविता समजावली. माझी जाणीव पक्व झाली.

१९६८–६९ सालांपासून असेल. पण माझ्या कविता कुठेही मी एकत्रच केलेल्या नव्हत्या. शाळा–कॉलेजच्या वह्या पुस्तकांवर खरडलेले ते कविताबद्ध विचार होते.

मध्यंतरी माहेरी गेले तेव्हा जुनी वह्या–पुस्तके पाहिली आणि जुना शालू पाहून मन भरते तसे मन भरून आले. आणि तेव्हा वाटले की, एखाद्या वहीत एकत्र करून, या कविता ठेवूयात. तरी सर्व कविता सापडल्या आहेत असे मला वाटत नाही.

त्या कवितांचा माझा श्रोता असे माझी आई व माझे आण्णा. कविता लिहून झाल्याबरोबर ती वाचून दाखवायला मी अगदी उत्सुक असे. आण्णा डॉक्टर होते. ते पेशंटच्या गर्दीतून सुटल्यावर व आई स्वैपाकात असतानाच माझे काव्यगायन होत असे. आईला माझी प्रत्येक कविता छान वाटत असे, तर आण्णा कधी कधी त्यावर टीका करीत असत. कधी पाठ असलेल्या इंग्लिश कविता म्हणून दाखवत. इंग्लीश कवितांचा **The Treasure** हा संग्रह त्यांनी मला एकदा दिला होता.

मागे वळून मी पाहते तेव्हा मला वाटते माझ्या कवितांमध्ये निराशावाद जास्त आहे का ? त्या त्या क्षणाचा उद्रेक फार प्रखर व सच्चा आहे. माणसाकडे किंवा वस्तुस्थितीकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोनच सोसण्याचा आहे का ? ज्या उत्कटतेनं मला दुःख, वेदना भावते त्या उत्कटतेनं सुख भावत नाही का ?

स्त्री मला फार जवळची वाटते, आणि कळते. म्हणूनच असेल कदाचित ६९ ते ७५ सालातील सर्व कवितांवर बांगला युद्धातील स्त्री अत्याचारांवर किंवा स्त्रीला वारयोषिता म्हणून जगाव्या लागणाऱ्या जिण्यावर आहेत.

> " विवस्त्र विक्रयाच्या या फुलांना
> चालेल दुरुन हुंगणे
> किंवा खरेदीविना केसात माळणे ! "

माझ्या या कविता ' कविता ' आहेत. आणि मला त्यांनी निश्चितच निर्मितीचा आनंद दिलेला आहे. कित्येकदा दिवस, महिने, वर्षे जातात आणि एकही भावना ' कविते 'त पकडता येत नाही. नुसती वांझ वर्षे ! तर कित्येकदा सरसरून कविता पेनमधून ओसंडत धावते. असो.

माझ्या या कवितांना उत्तेजनाचे खतपाणी घातले ते माझे कॉलेजचे दोन सर–म. ना. अदवंत व राजा महाजन यांनी. त्यांच्या ऋणातून मला मुक्त व्हायचे नाहीय.

या संग्रहाचे श्रेय आहे सुभाष अवचट व शांताबाई शेळके यांना– कारण माझ्या कविता या संग्रह करण्यासारख्या आहेत असे मला वाटत नव्हते व नाही. पण सुभाषच्या प्रचंड प्रोत्साहनाने मी हे पाऊल उचलले आहे. शांताबाईंबद्दल बोलायचे झाले तर त्यांची माझी भेट आयुष्यात फार उशीरा झाली असे मी म्हणेन !

विश्वासने तर माझं नावच लग्नात ‘ कविता ’ ठेवलं आहे. मला जेवढी कविता समजते त्यापेक्षा कितीतरी आधिक त्याला ‘ कविता ’ समजते हे मात्र खरे !

‘ बकुल ’ ! जी खरोखरच बकुलफुलागत आहे. मैत्रीला २० वर्षे झाली आहेत, पण भेटी–गाठीही होत नाहीत ... पण २० वर्षापूर्वीच्या त्या कवितांच्या आठवणी ताज्या आहेत ....

**कविता जपे**

हिरव्या डोहात कमळ डुलावे शुभ्र
तसे तू दिलेले दुःख
सांजच्या उन्हाची होताना राख
तसे माझे हे शब्द !

येथे समुद्र नाही म्हणून तीरही नाही
तारेही लकाकून फसवीत नाहीत येथे
निळ्यासावळ्या कातरवेळेची सांद्र भ्रांतीही नाही
माझ्या मेंदीरेखा येथे नाही होत केशरी
वातीही टिकत नाहीत येथे भरलेल्या गाभारी

येथे काहीच नाही–काहीच नाही
आठवण काढण्यास तुझी मला अमान नाही !

आपल्या श्वासांचेही ओझे
एवढे एकटेपण
जन्माला येणे हेच एक
सहेतूक जागरण
मरणापर्यंतचे ... ...

हातातले थवे सोडून द्यावेत
तसे भिरकावून दिलेले दिवस
फडफड ऐकत विव्हल झालेले
सुगंधी समजूतदार श्वास

कुठे मिटवावेत आसू ?
कसा लावावा कस ?
एका मागून एक जाणाऱ्या
अख्ख्या पायवाटा ओस !

माझ्यापरीस माझा असा
–असा वेगळाच सोस
पिठोरी चंद्र पदरी लपवून
साजरी हवी मला अवस !

सजताना हसलीस चितेवरील सतीसारखी
तर माझे मरण जिवंत होऊन तुला पाहील
केसातली फुले अश्रुंच्या बरोबरीने जळतील
तेव्हा घळलेले प्रेमगीत तुझ्या पावलांना स्पर्शील
माझे निष्प्राण माथे तू मांडीवर जोजवशील
त्या आधीच मी माती सुगंधित केलेली असेन

नभपावलापास
आहे बांधील सर
कधी ठोकरल्याने
रडते विसरून नूर

माझी उंच झालेली तान तू उचलून धर
घुमटात घुमू देत तो जपलेला प्रारंभ
तंद्रीभर असू दे मला असावध जाग
विरघळून जाताना तृप्त हुरहुरते सूर ...

गाणे भुलून जाईल कि
स्वरांनाच जडेल बाधा ?

प्राजक्ताचे रेखीवपण
शुभ्र स्वच्छ दिखावट
आत लाल दुःखी देठ
अश्रु अश्रु झालेली गात !

प्राण प्रतिष्ठेचा उत्सव गाभाऱ्यात
मंत्रजागरण आणि पुसू नयेस
अेवढी लावण्य गाणी ... ...
दार लोटतांना अखेरचे
खरेच का आकांतला गाभारा
' हे तर भावीण होणे झाले ' ! ... ...

अनवाणी पाय
पोळीत जाय
वेदनसाय
बोलायचं नाय
जरी जळो काय ...

नको नको रे असा
शब्द मला मागू
कलंकित अंगोपांगी
कसा तुला देऊ ?

तुमची मला याद येते
तुमचे न पाहिलेले डोळे
न भिजलेले ओठ
आठवतात
आठवतात इतके कि वाटते
आताच गर्भपात होतो आहे
जसा आत्मघात ! !
नुकता जीव धरला असेल नसेल
पाऊल पोटात थोडेसेच रुणझुणले
असेल नसेल . . .
माझे अश्रुही ओघळले नाहीत
तेव्हा
थोडेसे उरात तटतटून तुटले
अेवढेच स्मरते ...
माझ्या गर्भपाती छकुल्यांनो
तुमची मला याद येते
पराधीन दुःख स्मरते
तुमच्यासारखेच अनिकेत ...

चैत्रातल्या पूजेसारखे
तुझे चिंतन
प्रात:कालीन आहे
माझ्या मनातल्या स्वरतालांना
शुचित करणारे ...

आपले वार्धक्य आपणच सांभाळायचे असते
आपल्या तारुण्यासारखेच
ते सोपे; सीधे
म्हटले न म्हटलेले प्रिय
असतात भोवती–कडेपर्यंत
कोसळणेही भाग्याचे म्हणतात
( कोसळण्यासाठीच तारुण्य असते? )
रस्ताही सापडत नाही पावलांना
या वार्धक्यात
कोण सांभाळणार-सावरणार
हे डुचमळते घडे ?
दिवे लागण होता होता मिटलेली दारे ?
भोवळ आणणारे गेले गेले क्षण
यात्रेतच चुकलेले यात्रेतले हृदयगाणे
( काजव्यासारख्या या वार्धक्यातल्या वाती
क्षणात दिलासा, क्षणात काळीजघाव )
हाकेचा आकांत थरथरता ओठात
संपता न संपणारी निरुंद निर्मम रात्र
आणि हे एवढे वार्धक्य !

उतट हेतुंच्या पायामधले
घुंगूर मौनिम उरलेले
सोसण्याचे सोस अनावर
बधिर मनातून भरलेले !

रविंद्रांच्या कवितेसारखे तुझे बोलणे
कित्ती आठवल्या तरी अपूर अपूर आठवणी
मौनिम हुंकारात तुझ्या लाघव इतके दाटून
गीतांजलिच्या ओळींना द्यावे जसे लपेटून ?

चार भिंतीत बद्ध असलेले तीचे पातिव्रत्य
पाच पांडवांच्या पत्नीसारखे सुरक्षित असते;
कर्णाला पाहताच तिच्यातली द्रौपदी
अजून हळहळत असते ...
पातिव्रत्य सांभाळून ...

ग्रं. क्र. ..........

मरणोत्तर सारे विजय होतील तेव्हा
येथल्या पराभवांचे मला काही वाटणार नाही
तुझा लळा आणि तिच्या केसातले गजरे
नेता येणार नाहीत
हा पराभव मी मानणार नाही !
भर दिवसा मी चांदण्यात निजलो
हे मी विसरणार नाही
दोघांच्या मिठीतला तुझा मुका संपला तरी संपणार नाही
मरणोत्तर येथल्या भाषा मला कळणार नाहीत
कि माझे पुटपुटणारे असहाय ओठ तुम्हास दिसणार नाहीत
हे पराभव मी मानणार नाही
तुझ्या डोळ्यात आणि तिच्या मनात
माझेच शोध राहतील
मरणोत्तर
हेच माझे विजय होतील !!

धुक्यात अंधुक झालेले घर
किती मोहात पाडते
पापणी आड दडलेल्या
तुझ्या डोळ्यांसारखे ...

मुलुखभर माझे नाव म्हणून
पाठमोरा होवू नकोस;
डोईवरची बिंदी ज्यांनी हट्टाने घेतली फेडून
त्यांच्या मिठीतली वर्णने अैकू नकोस
त्यांचे शब्द पाण्यातले नाहीत
फत्तरेही नाहीत
– त्यांच्या संगे मी यात्रा केल्या; जत्रा फिरले
डोळ्यात पाऊसऋतु आणि
हातात सुकले हार घेवून
मी माझे गाणे शोधीत राहिले
कुर्बान झालेल्या या आयुष्यातला
अेक क्षण तुझा म्हण
उद्ध्वस्त माळावरले उरले फूल तुझे म्हण !!

विवस्त्र विक्रयाच्या या फुलांना
चालेल दुरून हुंगणे,
वा खरेदीविना केसात माळणे ...
अवेळी खुडलेल्या फुलांचे शाप
फुलांना फुलांनंतरच्या कळ्यांना ...

चोळामोळा झालेले आयुष्य झोळीत टाकून तो संन्यस्त झाला
त्याच्या विश्वस्त पावलाकडे पाहून मी पापण्या मालवल्या

त्याच्या तपस्येने हताश वाटेवाटेवर दिव्यांनी वात धरली
किती आभाळे पोरकी त्याच्या कुशीत निजून गेली

माझ्या पुनर्जन्माच्या कळांची दुःखे त्याने आपणहून साहिली
त्याच्या व्रतस्थ आशिर्वादाने देठेसुद्धा फुले झाली

मरणापर्यंतचे आयुष्य माझे उजळून तो अंधार प्याला
त्याच्या जात्या झोळीत माझा श्वास मात्र राहून गेला

चौदा वर्षापूर्वीची ही मी होते
या माझ्या कविता होत्या;
त्यातली मी कुठ आहे आज ?
कुठे गेला तो बहरलेला साज ?
दाटून येतो गळा हाकारतो त्या ' मी ' ला
सगळीकडे वैराण गाव मी हल्लीची . . .,
तो कॉलेजचा माळ त्या मैत्रिणी
तो मित्र उत्कट जवळचा
ओठावर तुजसाठी प्रीतऋचा
कुठे शोधू ? शोधू रे
या संसारात–चार माणसात
अेकटी मी आणि उरलेले स्पंदन
कविता . . . कविता . . . माझी कविता

त्या वहीत होती तुझी व माझी नावे
जुळलेली सोयरीक अन् दूरदूरची गावे

रंग तुझे छंद तुझे आश्वासने स्वप्नांची
गंधभार आमिषे ती मोह संमोहनाची

ते स्पर्श शपथा त्या ती गावे आणिक नावे
आकाश शोधणारे निर्वासित जणू रावे

ते गेले गेले म्हणता खरेच संपूनी गेले
वहीत माझ्या नाव तुझेरे तसेच राहूनि गेले

येणे तुझे हे अवचित माझ्या घरी
गुलमोहर स्मरला पूर्वीचा तो दारी

मोहरात बहरला होता तेव्हा जन्म
हर अेक दिवस तो होता आपुला सण

त्या वाटा आणिक वाटेवरले गाणे
बघ, अजून नाही झाले बापुडवाणे

किती भरला आहे गंध तुझ्या येण्यात
सारा हा संसार माझा अतूट तुझ्या डोळ्यात

२५७६
काव्य २५६३०
२५५८८

हा नाचक्कीचा सोस नव्हे तर  काय ?
ही उद्ध्वस्ताची आस नव्हे तर काय ?
या देहासाठी झाले मोहच फार
हा देह जळूनही राहियले अधिकार

विस्कटून गेले अंगण अन् रांगोळी
ते छत मायेचे निवास चंद्रमौळी
ती दोन पाऊले पूजिलेली मी तेव्हा
अजूनही वाटते हे दुःस्वप्नच केव्हा केव्हा. ...

अक्षदा उधळून आपण परस्परांचे झालो होतो
आज
आयुष्ये उधळून आपण लोकांचे झालो आहोत !

कुठेतरी आहे का स्मरण सरणापर्यंतच्या सोबतीचे
कुठेतरी आहे का वचन एकमेकासाठीच जगण्याचे

आशिर्वाद ते फोलच ठरले थोरांचे पितरांचे
हिशेब संपले इथेच इथले जन्माच्या जोडीचे

तो योग प्रितीचा रोग आम्हाला खरेच जडलां होता
कि होता तो एक भोग जन्मीचा वरून मुलामा खोटा

सारे काळ, सारे ऋतु मी त्यांची होते
परब्रह्म शरीर ज्यांना पूजेला सिद्ध होते
तू तरी पिसाटून पदर ओढू नकोस
मी तर केव्हाचीच उघडी आहे
मनाला वस्त्रे नेसवून भर्जरी . . . .

मनात माझ्या लाटा ग ऽ
फेसाळ तुझ्या हसण्यागत
मनात माझ्या अभाळ झुले
तुझेच स्वप्नचेले ग ऽ
मनात माझ्या घुमता पारवा
तुझेच नाचरे पैंजण ग ऽ
मनात माझ्या रूतून तू
रुसवून सारे ऋतु ग ऽ . . . .

अर्थ सुना येथे
गुन्हा घडलेल्या क्षणांचा
दाह फिका येथे
झरणाऱ्या अश्रुंचा
वेणा भोगता येतात
गाण्याच्या बरोबर येथे
फक्त ठेवावे लागते लपवून
हृदयातच तुटके नाते !

तुझी आणभाक
मला धाक
लक्ष्मण रेषेचा
भांगातल्या कुंकवाचा

ओढ अनावर
नजरेचा वावर
अंगभर अंगभर
मोहाची थरथर

वेचिला प्राजक्त मी रंगात न्हाले केशरी
तू असा आला प्रभाती मोह झाले मदभरी

आम्रवृक्षावरुनि घाली साद मजला कोकिळा
या धुक्या आडून माझा चंद्र मी तो पाहिला
झाड झुलता लहरला रे गंध सारा भूवरी

या दिसाचा आरंभ शुभ तो दर्शने तू दाविला
याचसाठी मी फुलांचा लक्ष होता वाहिला
दे तुझ्या गंधित श्वासा घेवुनि कर हा करी

उमलून आल्या कळ्या सुखाच्या
गंध जाहला धुंद
शांत अशा या निवांत वेळी
तुझा लागला छंद
अशाच किती तरी गेल्या संध्या
शोधित तव आभास
अशाच किती तरी गेल्या रात्री
शोधित रे मधुमास
त्याच रात्रींना स्मरून आज तू
घेवुनि ये स्वानंद
पुन्हा कधि ना हरवून देईन
द्वदसौख्याचा ठेवा
पुन्हा कधि ना तव विरहाचा
दाह जिवाला व्हावा
धावत यावे तव चरणासी
सोडूनि सारे बंध

बदामाच्या छत्रीखाली बसण्याचे मोह
किती वेगवेगळ्या वेळी असतात म्हणून सांगू !
कधी अगदी सकाळी सकाळी
प्राजक्त फुले वेचणे सोडूनच
मी त्या बदामाची होते
पहाट धुक्यागत त्याच्या कवेत जाते...
तर कधी संध्याकाळी
आभाळलेल्या उन्हाची तिरीप
हलकेच अंगावर घेत....
बदामाच्या छत्रीखाली बसण्याचे मोह
असे उगीच कुणालाही होतात का ?
त्याची जवळीक सांगायची ती रीत
लाल पाने अंगावर पडण्याचेते सुंदर गीत
शेजारचा टपोरा मोगरा आणि तळीची हिरवळ
बांबूचे गूज आणि झोपाळ्यावरील तुझी साद
साऱ्यांना मागे सारुन ही बदामछत्री
जेव्हा मला आवेगानं ओढून घेते
म्हणूनच कोणत्याही क्षणी मी त्याची होते !

आता फुलू आल्या कळ्या
पानोपानी रंग वेगळा
उजवली बघ कूस
आता ऊठ डोळे पूस

गुणगुणू लागे मन
पुसू आले सारे व्रण
एवढ्याच क्षणाचा रे
मला होता मोठा ध्यास !

चित सारे फुलाकडे
त्याला घेऊ केव्हा कडे
आता-माझ्या या मनाचे
ला नको हाँ साकडे !

सोडुनि फुलांचा मोह
घेतला खुषीने दाह
मज बघुनि सरणावरती
बोलतो रसिक जन वाह !

रे शब्द थांबले आले पाणी डोळा
ही कधी न यावी ताटातुटीची वेळा
ते व्रत आठवते तुजसाठी मी केले
जरी तशीच हाती सुकलेली वरमाळा

नक्षत्रांच्या ओढीनं जी झाली ती लगट पुन्हा पुन्हा
खरेच साधेल का मुहूर्त तो सुवर्णवेळा पुन्हा पुन्हा

घुंगूर पायी रूमझुम तुझ्यापास येतांना मुके
डोळे दोन्ही सख्या झुकले थोडे ओले थोडे सुके

जडेल का बाधा पुन्हा, पुन्हा सारे विसरायची
पडेल का ओढ पुन्हा तुझ्या सावलीत चालायची

सारे आभाळ ल्यायले महावस्त्र सुभग जसे
अेकेका ताऱ्याचेच कुंकुम लखलखते ठसे

नक्षत्रांच्या ओढीनं जो झाली ती लगट पुन्हा पुन्हा
खरेच साधेल का मुहूर्त तो सुवर्णवेळा पुन्हा पुन्हा

केव्हा गेली सये सांज दिस गेला हा ढळून
तुझ्यासाठी ठेवियली होती शेज सजवून
कवेमधे सारे सुख ठेवू बांधून झाकून
कधी कशी सरे रात्त तुला मला चकवून !

माझी वही
माझी सही
वंचनेची
साक्षी नाही

माझी वही
सारे साही
अंतर्यामी
खूप काही

थकतील पाऊले भ्रांति थकली नाही
श्रमतील ऋतु पण चक्र थांबले नाही
हा युगायुगांचा शाप मला काळाचा
मी तुझी होऊनी तुझी राहिले नाही !

बहरुन जायची मलाच इतुकी घाई
कि बघत नाही मी ऋतुही तो लवलाही
मग गळता पाने अकालीच का म्हणते
बहरणेच मजला मुळीच लाभत नाही !

२५८६

घेवुनि गळ्याची आण
ओवाळीन पंचप्राण
त्या एका शब्दासाठी
टाकिला मी जीव गहाण !

ही शब्दभूल रे मनास पडली भारी
प्राजक्त फुले ही पायी पडली सारी
ही पूजा माझी ठरेल कां अनठायी
ठरविणेच आता माझ्या हाती नाही

घट भरले म्हणता झाले मी निश्चिंत
घेतला मनाने तिथेच क्षण विश्रांत
डुचमळता पाणी पडे कडेवर थोडे
तेथेच निमिषसे अडे खुळे मन वेडे !

अरे ! होते केव्हातरी
मीही चंचल; उन्मन
आता संध्याकाळी सारे
निवले ते जळते ऊन

तरंगणाऱ्या मनाची गोष्ट सांगून
तू माझेही तेच केलेस
जे तुझे झाले आहे !
स्वतःच्या अेकाकी अनेक मनांच्या
( भुतांच्या ) गोंधळाकडे मीही जेव्हा
वरून पाहते
तेव्हा मला वाटते मी जणू वेट्लेस झाले आहे
अगदी मुंगीच. . . आणि हत्ती अेवढ्या
वजनाचे मोठे ओझे मी पेलते आहे
--माझ्या नसण्याचे
काय बोलायचे; कुणाशी बोलायचे
कळते त्याच्याशी बोलायचे कि
न कळणाऱ्याशीही बोलायचेच ?
बोलण्याची आणि अबोलण्याचीही सक्ती--
तुझे सारे प्रश्न माझे ही आहेत
गर्दीत हरवलेल्या पोराप्रमाणे
सुन्न खिन्न
अशाच हरवलेल्या दुसऱ्या
पोराचे बोट जेव्हा मिळते
तेव्हा
मास्तर वर्गात आल्यानंतरची शांतता
मनभर पसरते--

हा माझ्या शब्दाखातिर आखिर डाव
खेळिलास तू देत निरंतर घाव
त्या घावांची मी कधी न धरली पर्वा
बस् ! पुरे आता ही साफल्याची धाव !

झाकू मी किती या संसाराचे चित्र
वर बघुनि सारे हेवाजती मज मित्र
हे मजला माझे ठावूक रंग विस्कटले
चांदण्याची सखये, हरवून चालली रात्र

तुझ्या स्टुडिओतील
स्वागत करणारे रंगच रंग
तुझ्या सारखेच बिनधास्त
स्वच्छ; मोकळे
तरी आपापल्या जागीच
चपखल बसणारे
चेहेरे
शब्द, वैताग, ओढ आणि तिष्ठणं
त्या चित्रातील तावदानातून येणाऱ्या
उन्हाप्रमाणे ( ? ) ( ! )
तुझ्या चित्रांकडे बघता बघता
तुझ्या मनातून, बोटातून चित्रापर्यंतच्या
आणि
क्षणैक
त्या नंतरच्या सुद्धा
प्रवासात
बरोबर असण्याची अनिवार्यता--
जावू दे;
अर्धेच असू देत हे वाटणे
अर्धेच असू देत हे समजणे
माझे शब्द आणि माझी उमज
नुरली म्हणून नव्हे
तर
नकोयत शब्द म्हणून !

घेवुनि छातीशी फुले रातीची उमलवा मजला
गालावर हळूच फुंकर गरम उबेची घाला

रातीचा गौर चांदवा अन् आतुर तुमचे बोल
बोलात गोडवा अहा डोळ्यात मनीषा खोल

ही सजा कशाची नाथा मजला हो दिधली तुम्ही
दावियला ना मुखडा दिवसात कैक हो तुम्ही

मी मुळी न माझा आता सोडीन जुना हा हट्ट
या अेकातरी जन्माची सौख्याची अेकच वाट

घेवुनि मला नावात गुंफुनि टाका आपुले नाव
येवुनि आता स्वप्नात देवुनि टाका मनीचे भाव

व्यक्त होणाऱ्या थोड्या आणि अव्यक्ताच्या
किती तरी भावनांच्या मागे
जी प्रेरणा असते
त्याची लांबलचक वाट
झाडाझाडांच्या झुलण्यातून
फुलांच्या फुलण्यातून
मुलांच्या हसण्यातून
नी
घनदाट जंगलातील हिर्व्या वासातून
जाणारी असते
हे खरे आहे का ?

या प्रेरणा आणि या सावल्यांमधून
हलणारी अनुभूति
नीटनेटकी गुंफून तुम्हाला सांगावी...
किती मागे मागेपर्यंत पोहोचले आहेत हे क्षण
त्याच्यापासून दूर राहूनही त्याचेच असलेले
श्वासा श्वासावरचा त्याचा हक्क !
श्वासा इतकीच त्याच्या असण्याची
सहजता...
त्याला करावयाची प्रार्थना
कोणत्या प्रेरणेने ?
'माझेच गाणे गां' असे तो सांगेल का

कोंदलेल्या आभाळागत सारे थांबतेच
मनातले मन
ही प्रेरणा त्याचीच की !

येवू कशी ऽऽ येवू कशी ऽऽ
येवू कशी तुझ्यापास...

किती दूरच्या वाटा
नको ना बोभाटा
सोडू कशी तुझी आस...

जागता हा पहारा
सोबतीस ना वारा
शोधू कुठे सुख रास...

रे दिवेलाग झाली
आसू आले गाली
जिथे तिथे रे तुझा भास...

हार आणि जीत
यांच्या सीमेवर जेव्हा मी उभी असते

उदासीचं सावट इतकं मोठं असतं
कि संथ नदी, उंच डोंगर, मधला माळ
सारंच झाकोळून गेलेलं असतं...

प्रत्येक क्षण माझा गळा धरतोय असं वाटतं
माझ्या उधाणणाऱ्या हास्याला आणि
उत्साहाला जणू पक्षाघात होतो

वारंवार डोळ्यासमोर येते माझी मीच
लढता लढता
घोड्यावर कोसळलेल्या लक्ष्मीबाईच्या वेषात!
आणि
माझा घोडा ठप्प उभा राहतो
माझ्या संपलेल्या देहाकडे बघत
मान वळवून आज्ञेची!

मला आवडणारी गाणी, पुस्तके, बोनसाय
घर आणि काही नाती
आणि मलाच
जेव्हा मी कायमची सोडून जाईन
तेव्हा
उरलेल्या त्या असण्यावर
तुम्ही किती दिवस जीव लावाल ? हळहळाल ?
बोटावर मोजण्याइतके दिवस फक्त !
( असे मला वाटते )
कदाचित
तुमचे उभे आयुष्यही होरपळून निघेल
माझ्या नसण्याच्या धगीत !

कदाचित
माझी गाणी, पुस्तके, बोनसाय, आणि घर
यांच्या सततच्या आक्रंदनाने
बंद कबरीत जावून हे ओझे उतरवावे
असेही तुम्हाला वाटेल !
खरं सांगू !
माझ्या नसण्याने
तुमच्या आयुष्याचे मला भय वाटते !
आणि
माझी गाणी, पुस्तके, बोनसाय, आणि
तुम्ही
यासहच प्रयाण केले तर ? ?

या माणसाचे नाव गाव
काहीच मला माहित नाही म्हणून हा अनोळखी
आणि याचे सारे मला माहितीय
म्हणून हा ओळखीचा ?
जव्हा या अनोळख्यांच्या विळख्यात
अेखाद्या समारंभात
मी हरवून जाते तेव्हा
यांच्यातच ओळखीचे सूर सापडतात
त्यांच्या माझ्या हसण्यातून, बघण्यातून, बोलण्यातून
वाटते . . . कुठेतरी भेटलोय आपण....
या निकटच्या माणसांचे विचित्र प्रश्न ऐकून
दूरवरून येणाऱ्या त्यांच्या अस्पष्ट आवाजातून वाटते
यांचे चेहेरे, नावे, पत्ते, गावे
माझ्या माहितीचे आहे
पण ओळखीचे नाही !
माझ्या अेखाद्याच कवितेंच्या ओळीवरून
वेगाने धावणाऱ्या शब्दासाठी वाटते
किती किती जुनी आहे ही ओळख !
मैला न मैल आपण चालो
ते अगदीच अनोळख्यांच्या बरोबर
तेही खोटे हसत...

त्या रुपसुंदर क्षणांच्या संगतीने
इथले प्रत्येक झुडुप मी तजेलदार केले आहे
प्रत्येक राहुटीतल्या अंगणात स्वस्तिक रेखले आहे
खोल डोहाच्या तळातील तुझी स्वयंभू मूर्ती
लाल आसनावर सुशोभित केली आहे

तरी तू विचारतोस;
कुठे आहेत ते क्षण ? आणि कोणते ? '

REFBK-0025637
REFBK-0025637

बेटाच्या त्या टोकावरच्या
सफेद देवळाचे आमंत्रण
मी कसे टाळू शकेन?
काठाकाठाने मैल मैल तुडवीत
झिरपणाऱ्या झाडाच्या छायेत केव्हा बसले
किंवा
शिंपल्यांना शोधण्यात केव्हा हरवले
किंवा
नावेत फिरण्याचा मोह केव्हा पडला
आणि
हे सारं संपवून
जेव्हा आले परतून
पाहिले मागे त्या अनुभवातले मोठे उणेपण
देवळातला देव कोणता तेच पहायचे राह्यले!
त्या सर्वच अनुभवाचे एक शून्यच झाले
नसत्या दमणुकीचे!!

